सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्षे - ३ रे ❏ अंक - ११६ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ गुरुवार दि. २९ मे २०२५ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६

## ऑपरेशन सिंदूर अजून संपले नाही

### पंतप्रधान नरेंद्र मोदींचा पाकला थेट इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अलीपुरद्वार बंगाल**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज पश्चिम बंगालमधील अलीपुरद्वार येथे कोट्यवधी रुपयांच्या प्रकल्पांची पायाभरणी केली. यावेळी जाहीर सभेला संबोधित केले. यावेळी त्यांनी पाकिस्तानला थेट इशारा दिला. 'पाकिस्तानने हे समजून घ्यावे की, आम्ही तीन वेळा घुसून हल्ला केला आहे. ऑपरेशन सिंदूर अजून संपलेले नाही,' असे पीएम मोदी म्हणाले.



पंतप्रधान मोदी पुढे म्हणतात, '२२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या क्रूर कृत्यानंतर देशभरात खूप संताप होता. आमच्या माता-बहिणींचे सिंदूर पुसण्याचे धाडस केले. पण, आपल्या सैन्याने त्यांना सिंदूरची ताकद दाखवून दिली. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने जगाला सांगितले की, जर भारतावर दहशतवादी हल्ला झाला, तर शत्रूला त्याची मोठी किंमत मोजावी लागेल.'

'पाकिस्तानने हे समजून घ्यावे की, आम्ही तीन वेळा त्यांच्या घरात घुसून हल्ला केला आहे. आम्ही शक्तीची पूजा करतो. आम्ही दहशतवादाचे अड्डे नष्ट केले, ज्याची पाकिस्तानने कल्पनाही केली नव्हती. पाकिस्तानकडे दहशतवादाशिवाय काहीही नाही. पाकिस्तानने फक्त दहशतवादाला पोसले आहे. जेव्हा थेट युद्ध होते, तेव्हा पाकिस्तानचा पराभव निश्चित असतो. हेच कारण आहे की पाकिस्तानी सैन्य दहशतवाद्यांची मदत घेते,' अशी टीका पंतप्रधानांनी केली.

**कोट्यवधी रुपयांच्या प्रकल्पांची पायाभरणी**

'आज जेव्हा भारत 'विकसित राष्ट्र'कडे वाटचाल करत आहे, तेव्हा बंगालचा सहभाग अपेक्षित आणि आवश्यक आहे. या उद्देशाने, केंद्र सरकार येथे पायाभूत सुविधा, नवोपक्रम आणि गुंतवणुकीला सतत नवीन चालना देत आहे. बंगालचा विकास हा भारताच्या भविष्याचा पाया आहे. आज त्या पायावर आणखी एक मजबूत वीट जोडण्याचा दिवस आहे,' अशी प्रतिक्रिया पंतप्रधान मोदींनी व्यक्त केली.

## वाहन उद्योग केव्हाही बंद पडू शकतो...! चीनने रेअर अर्थ मेटल रोखले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९बीजिंग**

भारतातील ऑटोमोबाईल इंडस्ट्रीला मोठा धक्का बसला आहे. पेट्रोल, डिझेलसह इलेक्ट्रीक इंजिनसाठी लागणारे रेअर अर्थ मेटलचा पुरवठा चीनने रोखला आहे. यामुळे वाहनांचे उत्पादन मंदावण्याचा धोका निर्माण झाला आहे. यामुळे ऑटोमोबाईल कंपन्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे मदतीसाठी धाव घेतली आहे.



दुर्मिळ अर्थ मेटल्सच्या उत्पादनात चीनचा वाटा हा ६९ टक्के तर पुरवठ्यात ९० टक्के आहे. निओडायमियम, प्रासियोडायमियम, डिस्प्रोसियम आणि टर्बियम यांचा वापर इंधनाचे इंजिन आणि ईव्हीची मोटर बनविण्यासाठी केला जातो. या दुर्मिळ चुंबकाच्या निर्यातीवरच चीनने प्रतिबंध लादले आहेत. याचा फटका भारतीय ऑटो इंडस्ट्रीला बसण्यास सुरुवात झाली आहे.

पेट्रोल-डिझेल गाड्यांसाठीच्या इंजिनांमध्ये या वस्तूंपासून बनविलेला चुंबक हा १४० ग्रॅम आहे. मोटर-बॅटरी कॉम्बो असलेले इलेक्ट्रिक वाहन बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या या घटकांचे वजन सुमारे ५५० ग्रॅम आहे. म्हणजेच एक ईव्ही वाहन बनविण्यासाठी कंपन्यांना अर्धा किलोपेक्षा जास्त चुंबकीय पदार्थ लागतात. याचा तुटवडा झाल्यास ईव्ही उद्योगाला मोठा धक्का बसणार आहे. याचबरोबर या चुंबकाचा वापर पॉवर विंडो आणि ऑडिओ स्पीकर बनवण्यासाठी केला जाऊ शकतो.भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा ऑटोमोबाईल बाजार आहे. हुंडई, मारुती सुझुकी, फोक्सवॅगनसह इतर अनेक कंपन्या भारतात कार निर्मिती करतात आणि जगाला पुरवितात. चीनचे हे निर्बंध असेच कायम राहिले तर येत्या काही दिवसांत ऑटो उद्योग ठप्प होणार आहे. सियामने या प्रकरणात हस्तक्षेप केला असून पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या देखील कानावर हे प्रकरण घालण्यात आले आहे.

मे महिन्याच्या अखेरीस किंवा जूनच्या सुरुवातीला वाहन उद्योगाचे उत्पादन पूर्णपणे थांबण्याची शक्यता सियामने व्यक्त केली आहे. १९ मे रोजी मारुती सुझुकी, महिंद्रा अँड महिंद्रा आणि टाटा मोटर्सच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत सियामने ही चिंता व्यक्त केली होती.

## २०२४-२५ मध्ये राज्यात विक्रमी परकीय गुंतवणूक

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली माहिती

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.२९मुंबई**

देशाच्या आर्थिक प्रगतीचा विचार केल्यास महाराष्ट्र हा नेहमीच आघाडीवर राहिलेला आहे. तसेच गेल्या काही वर्षांत राज्यामध्ये येणाऱ्या परकीय गुंतवणुकीचा वेगही मोठ्या प्रमाणात वाढला आहे. दरम्यान, २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये महाराष्ट्रामध्ये विक्रमी परकीय गुंतवणूक आली असून, या वर्षात देशातील एकूण गुंतवणुकीपैकी ४० टक्के गुंतवणूक ही एकट्या महाराष्ट्रात झाली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.



याबाबत सोशल मीडियावर माहिती शेअर करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, ''मला हे सांगताना अतिशय आनंद होतो की, २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीची (जानेवारी ते मार्च २०२५) आकडेवारी सुद्धा आता जाहीर झाली असून, आता या संपूर्ण वर्षांत मिळून महाराष्ट्राने १,६४,८७५ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक आकर्षित केली आहे. जी यावर्षी देशात आलेल्या एकूण गुंतवणुकीच्या ४० टक्के इतकी आहे. यावर्षी देशात आलेली गुंतवणूक ही १,२१,९२९ कोटी रुपये इतकी आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी पुढे सांगितले की, महाराष्ट्रात गेल्यावर्षीचा विचार केला तर यावर्षी त्यापेक्षा ३२ टक्के गुंतवणूक अधिक आली आहे. या शेवटच्या तिमाहीत २५,४४१ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. महाराष्ट्रच्या बाबतीत हे वर्ष गेल्या १० वर्षांतील रेकॉर्ड स्थापित करणारे वर्ष ठरले. अर्थात हा रेकॉर्ड आपण पहिल्या ९ महिन्यातच मोडला होता. मी महाराष्ट्रातील जनतेचे अतिशय मनापासून अभिनंदन करतो. माझे सहकारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि मंत्रिमंडळाच्या नेतृत्त्वात आपल्या महाराष्ट्रची ही घौडदौड ही अशीच कायम राहील, असे आश्वासनही देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.

## एक कांदा ८०० ग्रॅम ते १ किलो वजनाचा

### नितीन गडकरींच्या पत्नीने केला अनोखा प्रयोग; भरघोस उत्पादन आले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९नागपूर**

नागपूरमधील धापेवाडा येथील भक्ती फार्ममध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या पत्नी कांचन यांनी ८०० ग्रॅम ते १ किलोपर्यंत वजन भरणारे कांदे उत्पादित केले आहेत. याची माहिती खुद्द नितीन गडकरी यांनी दिली आहे. गडकरींनी याचा व्हिडीओ पोस्ट केला असून बिया कुठून आणल्या, काय तंत्रज्ञान वापरले याची माहिती दिली आहे.

हे सर्व कांदे सेंद्रिय आहेत. या बिया नेदरलँडहून आणण्यात आल्या होत्या. सेमिनीस कंपनीच्या या अडीच किलो बिया एका एकर जमिनीत पेरण्यात आल्या. तिथे ४५ दिवस नर्सरी तयार करण्यात आली. यानंतर वाढलेली रोपे दुसरीकडे लावण्यात आली. डबल ड्रिप इरिगेशन करण्यात आले. या मातीत बायो ऑर्गनिक फर्टिलायझर मिक्स करण्यात आले होते. यानंतर या बेडवर मल्चिंग पेपर टाकण्यात आला, त्याला होल मारून रोपे लावण्यात आली.





जवळपास २४ हजार कांद्याची रोपे लावण्यात आली. या काळात ७ ते १० टक्के मृत्युदर राहिला, जो शेतीच्या प्रमाणात कमी होता. अखेर कांदा तयार झाला, एका कांद्याचे वजन ४०० ग्रॅम ते ८००-१००० ग्रॅम एवढे भरले. एका एकरातून गडकरींनी १२ ते १३ टन उत्पादन घेतले आहे. या काळात सर्व प्रकारची काळजी घेण्यात आली. अशाप्रकारे जर कोणी शेतकरी सेंद्रीय शेती करणार असेल तर आम्ही त्याला पूर्ण मदत करू, असे आश्वासन गडकरी यांनी दिले आहे. देशामध्ये महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये खरीप हंगामामध्ये कांद्याची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. मात्र, काही नैसर्गिक संकट उद्भवल्यास कांद्याच्या उत्पादनामध्ये कपात होऊन देशामध्ये कांद्याची टंचाई निर्माण होऊन दरवाढ होत असते. नाशिक, पुणे व सोलापूर पट्ट्यात कांद्याचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन केले जाते. परंतु लाल कांदा उत्पादनात नाशिक जिल्ह्याची 'मोनोपॉली' असल्याचे आजही मानले जाते. वास्तवात, ती पाच-सात वर्षांपूर्वीच मोडीत निघाली आहे. मध्य प्रदेश, गुजरात, राजस्थान व कर्नाटकमध्ये लाल कांद्याचे मागील पाच वर्षांपासून मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते.

## नागरिकांच्या पैशावर मातोश्री चालतेय; रवी राणांचा ठाकरेंवर गंभीर आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९मुंबई**

आमदार रवी राणा यांनी ठाकरे गटावर तसेच मुंबई महापालिकेतील घोटाळ्यांवर गंभीर आरोप केले आहेत. ते म्हणाले कि मिठी नदी प्रकरणात वारंवार घोटाळा उघड होतो आहे. उद्धव ठाकरे यांच्या काळात पाच ठराविक ठेकेदारांना काम दिले गेले, आणि गाळ काढल्याचा दावा करून तोच गाळ पुन्हा नदीत वाहून



गेला.महापालिका आयुक्त बांगर यांना अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले असून लवकरच चौकशी होईल. संबंधितांवर गुन्हे दाखल केले जातील. असे हि आमदार राणा म्हणालेत.

ठेके मिळण्याच्या प्रक्रियेत वारंवार त्याच ठेकेदारांना काम दिले जाते, हे संशयास्पद आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे या संदर्भात तक्रार केली जाईल.तर आदित्य ठाकरे यांनी या संपूर्ण प्रकरणावर उत्तर द्यावे.आठ दिवसांत अहवाल सादर होणार असून त्यानंतर प्रत्यक्ष पाहणी दौरा व कारवाई होणार असल्याचे आमदार रवी राणा म्हणाले. .

शहरातील १२ मिल्सपैकी कमला मिलमध्ये जसे गैरवापराचे प्रकार घडले, तसेच प्रकार इतर मिल्समध्येही होत आहेत.या ठिकाणी अवैध बार आणि पब चालवले जात असून त्यासाठी खढ क्षेत्रातील अभ्यासक आणि एक विशेष समिती तयार केली जाईल. ८० ते ९० जुन्या यादीतील जागा रिकाम्या केल्यास महापालिकेला मोठा फायदा होणार असल्याचे हि ते यावेळी म्हणाले.

## संजय राऊत यांचे नाव न घेता 'पाकिस्तानचा भोंगा' असा उल्लेख

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९मुंबई**

भारतीय जनता पक्षाच्या वतीने उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर जोरदार पलटवार करण्यात आला आहे. पक्षाने व्यंग चित्राच्या माध्यमातून संजय राऊत यांना थेट संबंध पाकिस्तानशी जोडला आहे. ऑपरेशन सिंदूर अपयशी ठरल्याबद्दल राऊत यांनी शंका उपस्थित केली होती. पाकिस्तान देखील तसाच दावा करत आहे. त्यावरुन भाजपच्या वतीने राऊत यांचा उल्लेख 'पाकिस्तानचा भोंगा' असा केला आहे.

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यानंतर भारतीय सैनिकांच्या वतीने ऑपरेशन सिंदूर राबवण्यात आले होते. मात्र हे ऑपरेशन सिंदूर अपयशी ठरले असल्याचा दावा पाकिस्तानच्या वतीने करण्यात येत आहे. त्यातच उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी देखील ऑपरेशन सिंदूर अपयशी ठरले असल्याबाबत शंका उपस्थित केल्या होत्या. त्यांच्या या वक्तव्याला भारतीय जनता पक्षाच्या वतीने देखील पलटवार करण्यात आला आहे. संजय राऊत यांचा उल्लेख पाकिस्तानचा भोंगा असा करत भाजपने एका व्यंगचित्र प्रसिद्ध केले आहे.

## पावसामुळे नुकसान झालेल्या नागरिकांना प्रत्येकी १० हजारांची आर्थिक मदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९बारामती**

राज्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे पुण्यासह कोकण, मराठवाडा, विदर्भात नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बारामती विधानसभा मतदारसंघात देखील पावसाने धुमाकूळ घातला आहे. अजित पवार यांनी आज पुन्हा एकदा बारामती मतदारसंघातील नुकसानग्रस्त भागांची पाहणी केली. यावेळी ज्यांच्या घरात पावसाचे पाणी शिरले, त्यांना दहा हजार रुपये देणार असल्याची घोषणा अजित पवार यांनी केली आहे.

शेतीचे नुकसान मोठ्या प्रमाणात झाले आहे. त्याचे पंचनामे करावे लागतील. त्याला थोडा वेळ लागू शकतो. मात्र, तात्काळ धान्य देण्यात येत असून ज्यांच्या घरात पाणी गेले त्यांना दहा हजार रुपये देण्यात येणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

## मान्सूनमध्येही ट्विस्ट! मोसमी वारे दडी मारणार?

### ६ जिल्ह्यांत ऑरेंज अलर्ट असतानाच हवामानात मोठा बदल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

राज्यात अवकाळी पावसाने झोडपून काढलेले असतानाच मान्सूनने एन्ट्री घेतली. जोरदार पाऊस सुरू झाला. नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी उत्तर भाग व्यापून पुढील २४ तासांत हेच वारे विदर्भ गाठणार आहेत. मराठवाडा आणि विदर्भात मुसळधार पावसाचा अंदाज आहे. गुरुवारी अमरावती, भंडारा, चंद्रपूर जिल्ह्यांना ऑरेंज अलर्टही जारी करण्यात आला आहे. परंतु, यातच एक नवी माहिती समोर आली आहे. मान्सून वाऱ्यांचा वेग मंदावणार असून पुढील पाऊस ७ जून रोजी होईल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

यााबाबत मिळालेल्या माहितीनुसार, बंगालच्या उपसागरावरून येणारा मान्सूनचा दुसरा प्रवाह सिक्कीममध्ये प्रवेश करील. येत्या दोन दिवसांत ही प्रक्रिया होईल. महाराष्ट्रात जवळपास ४५ टक्के भागात मान्सून व्यापला आहे. यानंतर विदर्भाकडे मान्सून वारे सरकू लागले आहेत. महाराष्ट्रात ३० मेपासून मात्र पुढील



पाच ते सहा दिवस मोसमी वाऱ्यांचा वेग मंदावणार आहे. वाऱ्यांचा पुढील प्रवास अतिशय मंद गतीने होत राहील. त्यामुळे राज्यात पाऊस काही दिवस विश्रांती घेण्याची शक्यता आहे. तसेही कालपासून राज्यात अनेक ठिकाणी पावसाने विश्रांती घेतलीच आहे.उत्तर पश्चिम बंगालच्या उपसागरात सक्रिय असणारे कमी दाबाचे क्षेत्र धिम्या गतीने पुढे सरकत आहे. मान्सून गंगेच्या पश्चिम बंगालमधील क्षेत्रासह सिक्कीम, ओडिशा या राज्यांत प्रवेश करेल असा प्राथमिक अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. याचा परिणाम महाराष्ट्रातही दिसून येईल. राज्यात मान्सूनची वाटचाल मंद राहील असा अंदाज आहे. त्यामुळे सध्या धुमाकूळ घालणारा पाऊस कमी होईल. पुढी पाऊस ७ जून रोजी होईल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

**दहा दिवस आधीच मान्सून महाराष्ट्रात**

केरळनंतर नैऋत्य मान्सून २५ मे रोजी मान्सून हा तळकोकणातील देवगडपर्यंत दाखल झाला आहे. महाराष्ट्र-गोव्यामध्ये दाखल होण्याची सर्वसाधारण जी सरासरी तारीख आहे, ती ५ जून आहे. याच्या दहा दिवस आधीच मान्सून दाखल झाला आहे. २००९ नंतर पहिल्यांदाच मान्सून महाराष्ट्रामध्ये इतक्या लवकर दाखल झालाय. केरळमध्ये २०११ साली २९ मे रोजी तर महाराष्ट्रात ४ जून,२०१२ साली केरळमध्ये ०५ जून तर महाराष्ट्रात सहा जून रोजी मान्सून महाराष्ट्रात धडकला होता.

## संपादकीय ......

# कोर्स कोणताही असो, कॉलेज बेस्ट निवडा!

यशाचे मापदंड ठरविण्यासाठी काही निकष निश्चित केलेले आहेत. यश मिळविण्याची प्रक्रिया ही तुम्ही निश्चित केलेल्या ध्येयसिद्धीच्या आरंभापासूनच सुरू होते. असे म्हटले जाते की, ‘थशश्रश्र लशर्सीप ळी हरश्रष वेपश.’ म्हणूनच तुमच्या करिअरचा अभ्यासक्रम कोणताही असू दे, तो जिथे शिकायचा आहे, ते कॉलेज बेस्ट असले पाहिजे. येथेच तुमचे निम्मे यश दडले आहे.

बारावीनंतर पुढे काय, हा प्रश्न त्यांनाच पडतो ज्यांनी बारावीनंतर पुढे काय करायचे, हे बारावीची परीक्षा देईपर्यंत ठरवले नसते किंवा बारावीचे परसेंटेज बघून ठरवू, अशी ज्यांची धारणा असते किंवा कोणत्या क्षेत्रात संधी जास्त आहेत, याचा शोध ज्यांचा संपलेला नसतो. गुणांची टक्केवारी कितीही असू दे, ज्यांना भविष्यात काय करायचे आहे, हे ठरलेले आहे ते विद्यार्थी बारावीनंतर काय, या विवंचनेत चाचपडत बसत नाहीत. ज्याला आयएएस बनायचे आहे, त्याला बारावीत फक्त ३५ टक्के गुण पडले, तरी तो यूपीएससी परीक्षा देण्याची जिद्द सोडत नाही. कारण, त्याला माहीत असते की, पदवी परीक्षेत निव्वळ पास क्लास मिळाला, तरी तो काही बुद्धिमत्तेचा अंतिम पुरावा नाही. यंदा अभियांत्रिकी प्रामुख्याने बायोटेक, बायोइंजिनिअरिंग आणि हेल्थ इन्फॉर्मेटिक्स यासारख्या अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांची जास्त पसंती आहे. कारण, या क्षेत्रांत रोजगाराच्या संधी वाढल्या आहेत. यानंतर संगणक विज्ञान आणि सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग व्यतिरिक्त अन्य अभियांत्रिकी शाखांमध्येही विद्यार्थी रस घेऊ लागले आहेत, असे याबाबतचा अहवाल सांगतो.राष्ट्रीय वैद्यकीय परिषदेने मागील वर्षी मंजुरी दिलेल्या महाराष्ट्रातील आठ नव्या सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांपैकी अंबरनाथच्या मेडिकल कॉलेजने पहिल्याच वर्षी सर्वाधिक ६४६ पर्सेन्टाईल ‘कटऑफ’ नोंदवला आहे. या आठही कॉलेजांत राज्य सीईटी कक्षाकडून भरल्या जाणार्या सर्वच्या सर्व ६८० जागा एकाच फेरीत भरल्या गेल्या आणि त्यासाठी जनरल कॅटेगरीतील प्रवेशाचा पर्सेन्टाईल कटऑफ होता ६४६, तर सर्वात कमी मागास जिल्हा गडचिरोलीच्या कॉलेजचा कटऑफ होता ६२८ पर्सेन्टाईल. यावरून असे लक्षात येते की, सरकारी वैद्यकीय महाविद्यालये राज्यात कुठेही असू देत, एमबीबीएस बनण्याची तीव- स्पर्धा वैद्यक क्षेत्रात आहे, हे स्पष्ट होते.भारतीय विद्यार्थ्यांना देश-विदेशात बहुतांश विज्ञान, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात गलेलठ्ठ पॅकेजच्या संधी उपलब्ध झाल्याने अभियांत्रिकी आणि वैद्यक क्षेत्रात प्रचंड स्पर्धा निर्माण झाली आहे. त्यामुळे बारावीनंतर पुढे काय, हा प्रश्न बारावीनंतर पडूच नये, तर बारावीनंतरचं ‘माझं बारावीपूर्वीच ठरलंय’ ही भूमिका प्रत्येक विद्यार्थ्याची हवी. बारावीत किंवा नंतर वर्षभरात तुम्ही निवडत असलेल्या विद्या शाखेची लांबी, रुंदी आणि खोली तुम्हाला पदव्युत्तर शिक्षण घ्यायला गेल्यावर समजेल; पण ते सगळ्यांना शक्य नाही. सध्या सर्वच अभियांत्रिकी शाखांना वाव आहे. प्रत्येक शाखेतील पदवीधर काही अशा गोष्टी करू शकतात जे इतर पदवीधर करू शकणार नाहीत. त्यामुळे तुमच्याकडे एकच पर्याय उरतो तो म्हणजे, शाखा कुठलीही का असेना, अभियांत्रिकी असो अथवा वैद्यकीय; उत्तम महाविद्यालय निवडा! तिथे तुमच्यासोबत देशभरातील बरीच हुशार आणि मेहनती मुले असतील. ते त्या शिक्षणातून काय घेतात, अभ्यास कसा करतात याचे निरीक्षण करा आणि मेहनत घ्या. तुम्हाला यश आणि पैसाही निश्चितच मिळेल.

# पीक व खतांच्या नियोजनासाठी वेळीच माती परीक्षण करा

## जिल्हा मृद चाचणी अधिकाऱ्यांचा सल्ला : जमिनीतील मूलद्रव्यांची माहिती होणे गरजेचे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती** – पीक व खतांच्या मात्रांची माहिती होण्यासाठी तसेच खारपट व चोपण जमिनीची प्रत सुधारण्यासाठी माती परीक्षण लाभदायी ठरते. शेत जमिनीतील प्रातिनिधिक माती नमुना काढून प्रयोगशाळेत रासायनिक पृथक्करण करून घेणे म्हणजे माती परीक्षण करणे शेतकऱ्यांसाठी हिताचे ठरणारे आहे. यात मातीतील मुख्य, दुय्यम आणि सूक्ष्म अन्न द्रव्यांचे प्रमाण तपासले जाते. त्यानुसार पिकांचे आणि खतांचे नियोजन करता येते. माती परीक्षणामुळे पिकांना खतांची मात्रा ठरविता येते.




रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे मातीचा पोत दिवसेंदिवस खालावत आहे. पीकवाढीसाठी आवश्यक अन्न द्रव्यांचासमतोल राखण्यासाठी तसेच जमिनीतील अन्नद्रव्यांचे प्रमाण जाणून घेण्यासाठी माती परीक्षण ही काळाची गरज आहे. हे लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी खरीप पेरणीपूर्वी माती परीक्षण करून घ्यावे, असा सल्ला जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकाऱ्याने दिला आहे.

### माती परीक्षणाचे फायदे काय?


शेत जमिनीतील उपलब्ध अन्नद्रव्यांचे प्रमाण समजते. खतांचा पुरवठा करणे सोपे जाते. माती परीक्षणानुसार खत व्यवस्थापन करून पीक उत्पादनात वाढ होते. खतांची बचत होण्यासाठी मदत होते. जमिनीची सुपीकता टिकवून उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी उपाययोजना करता येतात.

नमुना घेताना काळजी घ्या

पिकांची कापणी झाल्यानंतर मशागतीपूर्वी मातीचा नमुना घ्यावा. शेताच्या चारही बाजूंनी बांधापासून किमान एक मीटर अंतर सोडून नमुना घ्यावा, पीक असेल तर दोन ओळीतील जागेतून मातीचा नमुना घ्यावा. जमिनीला खत दिले असल्यास अडीच ते तीन महिन्यानंतर मातीचा नमुना घ्यावा, माती नमुने पाठवण्यासाठी खतांच्या पिशव्यांचा वापर करू नये.

नमुने कसे घ्याल?माती परीक्षणासाठी हेक्टरी १० ते १२ ठिकाणच्या खड्ड्यातील नमुने घ्यावे. त्यासाठी २५ ते ३० से. मी.चा खडा खोदून त्यातील माती बाहेर काढून टाकावी. त्यानंतर त्या खड्ड्यातील माती उकरून काढावी. ती माती जमा करून त्यातील काडीकचरा, पालापाचोळा वेगळे करावे. त्या मातीचे चार भाग करून वाळवावी. त्यानंतर माती भरून तपासणीसाठी पाठवावी.

# पातुरात वादळी वाऱ्याने जिरायत भागातील फळबागा, ज्वारी, फुलशेती, भाजीपाला पिकेही उद्ध्वस्त



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९पातूर** – तालुक्यात झालेल्या वादळी वाऱ्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. विशेषतः लिंबू आणि केळी उत्पादक शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून, जिरायत भागातील फळबागा, ज्वारी, फुलशेती, तसेच भाजीपाला पिकेही या आपत्तीत उद्ध्वस्त झाली आहेत.खानापूर रोडवरील शंकरराव बोचरे यांच्या शेतातील ज्वारीचे नुकसान झाले आहे. लिलाबाई गाडगे,लक्ष्मण गाडगे, कैलास पाटील, योगेश इंगळे, सखाराम खंडारे लिंबू शेती यांच्यासह अनेक शेतकऱ्यांचे नुकसान मोठ्या प्रमाणावर झाले आहे. वाऱ्यामुळे केळीच्या बागा उद्ध्वस्त झाल्या. शिर्ला येथील विवेक गुलाबराव वालो कार यांच्या केळी चे नुकसान झाले आहे. लिंबाच्या झाडांवरील फळे गळून पडली. फुलशेतीतील नाजूक झाडे आणि भाज्यांची पिके पूर्णतः सडून गेली. या अनपेक्षित आपत्तीत शेतकरी हवालदिल झाले असून, त्यांनी तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे.पाऊस आणि वाऱ्यामुळे तालुक्यातील अनेक भागातील पिकांनाही मोठा फटका बसला आहे. संपूर्ण तालुक्याचा सर्वे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून करण्यात येत आहे. प्रशासनाने तातडीने नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून आर्थिक मदतीचा निर्णय घ्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेरील अभ्यास दौरे योजनेच्या निकषांत झाले बदल; जाणून घ्या सविस्तर

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक**

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

राज्यातील शेतकऱ्यांना विदेशातील आधुनिक शेती तंत्रज्ञानाची ओळख प्रत्यक्ष करून देण्याच्या उद्देशाने कृषी विभागामार्फत राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेरील अभ्यासदौरे ही योजना राबविण्यात येते.

सन २०२४-२५ मध्ये या योजनेत शेतकरी निवडीचे निकषांमध्ये शेतकरी किमान बारावी पास असावा व वयोमर्यादा वय वर्षे २५ ते ६० असावी हे प्रमुख निकष होते.

मा.आयुक्त कृषी यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती बैठकीमध्ये या निकषांत बदल करण्यात आले असून किमान शिक्षणाची अट व कमाल वय साठ वर्षे हि अट रद्द करण्यात आली आहे. महिलांचेशेतीतील अमूल्य योगदान लक्षात घेता सन २०२५-२६ या वर्षात महिला शेतकऱ्यांना परदेश अभ्यास दौऱ्याची संधी मिळावी या उद्देशाने या योजनेत महिला शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल.




सदर योजनेत सन २०२४-२५ मध्ये युरोप, ब्राझील, ऑस्ट्रेलिया व थायलंड या देशांची परदेश अभ्यास दौऱ्याकरिता निवड करण्यात आली होती.सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात युरोप, इस्राईल, चीन, जपान, मलेशिया, व्हिएतनाम, फिलीपाईन्स व दक्षिण कोरिया या देशांचा समवेश करण्यात आलेला आहे.

या योजनेंतर्गत शेतकरी निवडीचे निकष, सन २०२५-२६ करिता दौरा देश या बाबींमध्ये बदल केल्यामुळे सन २०२४-२५ मध्ये करण्यात आलेली शेतकरी निवड रद्द करण्यात येत आहे.

तथापि ज्या शेतकऱ्यांची पूर्वी निवड झालेली होती ते नव्याने अर्ज करू शकतात व पात्रतेनुसार त्यांचाही विचार या योजनेंतर्गत केला जाईल.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# ‘त्या’ नवजात बाळाच्या मृत्यूप्रकरणी महिला डॉक्टरविरुध्द गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९वरुड**- स्थानिक एका खासगी रुग्णालयात गर्भवती महिला नियमित तपासणी करीत होत्या. ऑगस्ट २०२४ ला प्रसूतीकरिता दाखल होऊन सिझेरियन प्रसूतीची गरज असताना महिला डॉक्टरनी नॉर्मलप्रसूती केल्याने बाळाच्या जिवाला धोका निर्माण होऊन मृत्यू झाल्याची घटना घडली होती. यासंदर्भात प्रसूत महिलेच्या पतीने वरूड पोलिसस्टेशनमध्ये तक्रार दिल्यावरुन पोलिसांनी डॉक्टरविरुद्ध मृत्यूस कारणीभूत असल्याचा सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला.डॉ. मीना एस बंदे असे महिला डॉक्टरचे नाव असून शेख फैजान शेख फिरोज(३२) रा. इस्लामनगर संत्रा मंडीजवळ वरूड असे फिर्यादीचे नाव आहे. फिर्यादीची पत्नी ही गर्भवती असताना नियमित तपासण्या बंदे हॉस्पिटलमध्ये सुरू होत्या. ४ ऑगस्ट २०२४ रोजी फिर्यादी यांच्या पत्नीची प्रसूती ही बाळाच्या जिवाला धोका असल्याने सिजेरियन शस्त्रक्रिया करून करणे आवश्यक होते; परंतु डॉ. मीना बंदे यांनी नॉर्मल प्रसूती केली. यामध्ये जन्मानंतर बाळाचा मृत्यू झाला. अशा तक्रारीवरून मंगळवार २७ मे २५ रोजी रात्री महिला डॉक्टरविरुद्ध कलम १०६(१) बीएनएस, ३०४ भादंविनुसार सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास ठाणेदार अर्जुन ठोसरे यांच्या मार्गदर्शनात वरूड पोलिस करीत आहे.




# थंड पाण्याने अंघोळ केल्यावर शरीरावर काय परिणाम होतो? चांगला की वाईट, घ्या जाणून

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक**

थंड पाण्याने अंघोळ केल्याने अनेकदा विविध आरोग्य फायद्यांचा संबंध येतो, जसे की उर्जेची पातळी वाढवण्यापासून ते रक्ताभिसरण सुधारण्यापर्यंत. मात्र, ही पद्धत काही व्यक्तींसाठी, विशेषतः ज्यांना आरोग्याच्या समस्या आहेत त्यांच्यासाठी काही धोके घेऊन येऊ शकते. थंड पाण्याचे उत्साहवर्धक परिणाम आकर्षक असू शकतात, परंतु तापमानात अचानक होणारा हा बदल शरीरावर कसा परिणाम करतो हे समजून घेणे आवश्यक आहे; विशेषतः हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी आजार असलेल्यांसाठी. चला तर मग जाणून घेऊयात, थंड पाण्याने अंघोळ केल्यावर शरीरावर काय परिणाम होतो?



**थंड पाण्याचा तुमच्या शरीरावर कसा परिणाम होतो**

थंड पाण्याचा वापर शरीराला अचानक तापमानात बदल घडवून आणतो, यामुळे रक्तवाहिन्या आकुंचन पावतात. यामुळे रक्तदाब वाढतो आणि रक्ताभिसरण चालू ठेवण्यासाठी हृदयाला अधिक काम करावे लागते.

**हृदय गती आणि रक्तदाब वाढणे :** डॉ. सिंघला स्पष्ट करतात की, थंड पाण्याच्या संपर्कामुळे हृदय गती आणि रक्तदाब जलद वाढतो, जो उच्च रक्तदाब किंवा कमकुवत हृदय असलेल्या व्यक्तींसाठी समस्या बनू शकते. हृदय व रक्तवाहिन्यांचा हा वाढलेला ताण हृदयविकाराचा झटक्यास कारणीभूत ठरू शकतो.

**रक्तवाहिन्यांचे आकुंचन :** डॉ. सिंघला यांनी सांगितल्याप्रमाणे, शरीराची नैसर्गिक प्रतिक्रिया म्हणजे शरीराचे मुख्य तापमान राखण्यासाठी रक्तवाहिन्या आकुंचन पावणे. हृदयरोग असलेल्या लोकांसाठी हे आकुंचन हृदय आणि मेंदूसारख्या गंभीर भागात रक्त प्रवाह मर्यादित करू शकते, ज्यामुळे हृदयविकाराचा झटका किंवा स्ट्रोकचा धोका वाढतो.

**हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी प्रणालीवर ताण :** डॉ. मंजुषा अग्रवाल, वरिष्ठ सल्लागार-अंतर्गत औषध, ग्लेनेगल्स हॉस्पिटल्स, परळ, मुंबई, यावर भर देतात की, थंड पाण्यामुळे होणारा अतिरिक्त हृदयविकाराचा ताण आधीच हृदयरोग असलेल्या व्यक्तींसाठी खूप जास्त असू शकतो. या ताणामुळे दम लागणे, छातीत दुखणे किंवा हृदयविकाराचा झटकादेखील येऊ शकतो.

**कोमट पाण्याने अंघोळ :** डॉ. सिंघला यांच्या मते, कोमट पाणी हृदयावर जास्त ताण न देता रक्ताभिसरण वाढवू शकते. हा पर्याय स्नायूंना आराम देण्यासाठी आणि थंड पाण्याशी संबंधित जोखीम न घेता मानसिक स्पष्टता सुधारण्यासाठीदेखील प्रभावी आहे.

# राष्ट्रीय अन्नसुरक्षा व पोषण अभियान, अन्नधान्य व तेलबिया पिकांसाठी अनुदानावर बियाणे उपलब्ध

## लोकनी लाभाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती-** राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान अन्नधान्य पिके व व्यापारी पिके आणि राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया अंतर्गत पिकांची उत्पादकता वाढ व बियाणे बदलाचे महत्त्व विचारात सुधारणांचे प्रसारित /संकरीत वॉटोच्या निश्चित बियाणे वितरण व पीक प्राक्षिकांचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या अभ्यंतर्गत अन्नधान्य पिके, शेतकरी पिके व तेलबिया पिकांची टक्केवारी बियाणे उपलब्ध करून देण्यात येत आहे. या सर्वाचा शेतकरी बांधवांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी संचालक आणि लाभ घ्या. शा. वाहनवाडी यानी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.




या घटकांत आर्थिक साहाय्य हक्क ०.२० हे. ते कमाल १ हेक्टरपर्यंत आहे. उपलब्ध उपलब्धता वितरण या घटकाचा लाभ स्थानिकबिया- लाभार्थी असून सोबीन, भुईमुग, सुर्यफुल व तीळ या पिकांकरिता १००% अनुदानावर उपलब्ध आहे. याकरिता https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer-griLogin/-griLogin या संकेतस्थळावर बियाणे वितरण, प्रात्यक्षिक, फ्लेक्सी घटक, औषधे आणि खते या टाईल अंतर्गत निवडणूक अर्ज करता करता. या घटकाची प्रथम लाभार्थी निवड दि. ३०.५.२०२५ तारखेला होणार आहे.तसेच भात, तुर, मुग, उडीद, मका, बाजरी, नाचणी, वरई या पिकांकरिता अनुदानावर प्रमाणित बियाणे उपलब्ध आहे. पद-के ७/१२ उता-यासह कोणतेही ओळखपत्र बियाणे वितरकाला बाहेरून समर्थन वजा जाता लोकवाटा भरून निश्चित बियाणाचा लाभ घ्या. प्रमाणित अर्ज सादर करणे बँक-ग्रिस्टॅक घटकांची नोंदणी बंधनकारक आहे. लाभार्थी निवड प्रथम अर्ज करणा-यास प्रथम या तत्वावर बेतलेला आहे. प्रमाणीकरण वितरण घटक लाभाभ्यास लाभार्थ्यासाठी मोठ्या प्रमाणावर शेतकरी बांधवांनी आपले बियाणे वितरण या घटक लाभघ्यावा असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. २९ मे २०२५

शहर/ग्रामिण




# उत्तम समन्वय, सहकार्याने जिल्ह्याच्या विकास घडविला -जिल्हाधिकारी सौरभ कटियार







**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती,**

जिल्ह्यात गेल्या दोन वर्षांपासून काम करीत असताना विविध विभागातील उत्तम समन्वय आणि अधिकारी, कर्मचारी यांच्या सहकार्याने जिल्ह्याच्या विकासाला हातभार लागला असल्याची प्रतिक्रिया जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी व्यक्त केली.

जिल्हा नियोजन सभागृहात जिल्हा प्रशासनाच्या वतीने श्री. कटियार यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी पद्मश्री शंकरबाबा पापळकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी संजीता महापात्र, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, जिल्हा पोलिस अधिक्षक विशाल आनंद, अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंद दाणेज, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, सागर पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर आदी उपस्थित होते.

श्री. कटियार म्हणाले, प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने जिल्हा अतिशय चांगला आहे. जिल्ह्याच्या दृष्टीने मेळघाट हा अतिशय महत्वाचा भाग आहे. या भागाच्या विकासासाठी जिल्हाधिकारी म्हणून कार्य करताना नेहमीच चांगले काम करण्याचा दृष्टीकोन ठेवला. प्रत्येक कार्य करताना प्रशासनातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे चांगले सहकार्य मिळाले. आदिवासी आणि जंगलाचा भाग असलेल्या जिल्ह्यात आरोग्य आणि ग्रामीण भागातील प्रश्न सोडविण्यासाठी एकत्रित येऊन कार्य केले. त्यामुळे राबविलेल्या प्रत्येक उपक्रमाला यश मिळाले.

जिल्हा प्रशासनात ई-ऑफीस आणि इतर महत्वपूर्ण उपक्रम राबवून लोकाभिमुख प्रशासन करण्यावर भर दिला. समस्या घेऊन येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला त्यावरील उपाययोजना देऊन आश्वस्त केले. त्यामुळे सामाजिक संघटनांची प्रशासनाला चांगली साथ मिळाली. गेल्या वर्षातील दोन निवडणूकांमध्ये सर्व घटकांनी चांगला प्रतिसाद दिल्याने मतदानाच्या टक्केवारीत विक्रमी वाढ झाली. समन्वय आणि सहकार्य मिळाल्याने प्रशासनाची कार्यक्षमता वाढण्यास मदत झाली. पीएम मित्रा, मेळघाट आणि अमरावती विमानतळावरून प्रवाशी सेवेचा शुभारंभ ही कार्यकाळातील महत्वाच्या नोंदी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी पद्मश्री शंकरबाबा पापळकर, मुख्य कार्यकारी संजीता महापात्र, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, जिल्हा पोलिस अधिक्षक विशाल आनंद, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, सागर पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बयास, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, प्रसेनजित चव्हाण, तहसिलदार विजय लोखंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी कैलास घोडके, सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर, डॉ. विकास खंडारे, राजेश चौरपगार, विजेश वरतानी, कमल राठी, विवेक पिढेकर यांनी मनोगत व्यक्त करून श्री. कटियार यांच्या कार्यकाळातील कार्याला उजाळा दिला. क्षिप्रा मानकर यांनी सूत्रसंचालन केले.

## मोबाईल टावरचे रिमोड रेडिओ हेड चोरी

विदर्भ प्रजासत्ताकदि.२९शिरखेड :पोलिसस्टेशन अंतर्गत येणाऱ्या नेरपिंगळाई येथील शेतात लावलेल्या टावरचे रिमोड रेडिओ हेड अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २० मे रोजी दुपारी घडली.

सागर शंकर मरकाम (३५) रा. खेड असे फिर्यादी मजुराचे नाव आहे. ते शेतातील टावर पाहणीसाठी गेले असता त्यांना ५६ हजार १८४ रूपये किंमतीचा रेडिओ हेड चोरी गेल्याचे लक्षात आले.

# सुटीच्या दिवशी विद्यार्थ्यांची खिचडी खाल्ली तरी कुणी?

### अमरावती महानगरपालिकांच्या आठ शाळांचा 'फ्रॉड' उघड...

## शिक्षणाधिकाऱ्यांनी बजावली नोटीस, मुख्याध्यापकांना खुलासे सादर करण्याचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती**

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत अमरावती महापालिका हद्दीतील शाळांना खिचडी वाटप ही शाळा व्यवस्थापन समितीमार्फत महिला बचत गटाकडून करण्यात येत आहे; मात्र सुटीच्या दिवशीही विद्यार्थ्यांनी खिचडी खाल्ली अशी खुद्द कबुली मुख्याध्यापकांनी पोर्टलवर सादर केलेल्या माहितीनुसार समोर आली आहे. अमरावती महापालिकेच्या आठ शाळांमध्ये हा नियमबाह्य प्रकार झाल्याचे समोर आले असून शिक्षणाधिकाऱ्यांनी मुख्याध्यापकांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.राज्याचे शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी यांनी पोर्टलवर सुटीच्या दिवशी शाळांनी उपस्थितीची नोंद केल्याबाबत ताशेरे ओढले आहेत. एवढेच नव्हे तर शाळांनी केलेल्या नोंदीच्या आधारे शाळांचे इंधन, भाजीपाल्याची देयके ऑनलाईन पद्धतीने जनरेट करण्यात येत असून शाळांच्या खात्यावर हे अनुदान वर्ग केले जाते; परंतु बहुतांश शाळांनी शासकीय सुटीच्या दिवशीही विद्यार्थ्यांनी आहार घेतल्याची नोंद पोर्टलवर केल्याचे दिसून आले. ही आहार चोरी पकडल्याने जिल्हा परिषद, मनपा शिक्षणाधिकाऱ्यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. एएमएस पोर्टलवरील नोंदीचा आढाव्याचे निर्देश शिक्षण संचालकांनी दिले. त्यामुळे आर्थिक फसवणूक करणाऱ्या शाळांविरुद्ध कडक प्रशासकीय कारवाईच्या सूचना शिक्षणाधिकाऱ्यांना मिळाल्या आहेत.



### शासकीय सुटीच्या दिवशी या शाळांनी केली उपस्थितीची नोंद

महापालिका मराठी शाळा, बेनोडामहापालिका उर्दू गर्ल्स स्कूल नंबर ३ जुनीवस्ती बडनेरा, महापालिका मराठी शाळा अकोली, संत गाडगे बाबा प्रायमरी स्कूल, शिवाजीनगरमहापालिका प्रायमरी मराठी स्कूल नंबर २०, नवाथे नगरअसोसिएशन उर्दू गर्ल्स हायस्कूल चांदनी चौक अमरावतीमहापालिका उर्दू प्रायमरी स्कूल नंबर ५ फ्रेजरपुरा अमरावती.

# 'हे' ॲप तुमच्या मोबाईलमध्ये असायलाच हवे!

## देतो वीज पडण्याचा इशारा

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती**

मान्सून कालावधीत विशेषतः जून-जुलै महिन्यांत वीज पडून जीवितहानी होत असते. वीज पडून जीवितहानी होऊ नये, याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून भारत सरकारच्या पृथ्वी मंत्रालयाने दामिनी ॲप तयार केले आहे. या यामध्ये आपल्या सभोवताल वीज पड़त असल्याचे संकेत वीज पडण्यापूर्वी मिळणार असून, नागरिकांना सावध करणार आहे. दामिनी ॲप गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे. सुरक्षात्मक उपाययोजना म्हणून तलाठी, मंडलाधिकारी, सरपंच, ग्रामसेवक, कृषीसेवक, कोतवाल, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेवक, ग्रामपंचायत डाटा एन्ट्री ऑपरेटर यांना सदरचे ॲप डाउनलोड करून त्याचा वापर करण्याबाबत नागरिकांमध्ये जागृती केली जाणार आहे. जीपीएस लोकेशनवर सदर ॲप काम करते. वीज पडण्याच्या मिनिटांपूर्वी १५ यामध्ये स्थिती दर्शविण्यात येणार आहे. अमरावती जिल्ह्यात मेळघाट परिसरात जंगलाचे प्रमाण अधिक आहे. तसेच पावसाळ्यात आदीवासी शेतकरी शेती करण्यासाठी बाहेरच असतात. परिणामी राज्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलने वीज बळीची संख्या पावसाळतात अधिक असल्याचे दिसून येते.

### विजा कडकडत असल्यास ही खबरदारी घ्या

विजा चमकत असताना, मोकळ्या ठिकाणी किंवा उंच ठिकाणी राहू नका. लगेच सुरक्षित ठिकाणी जा, जसे की इमारत, गाडी (काचा बंद करून) किंवा इतर छत असलेले ठिकाण. धातूच्या वस्तू दूर ठेवा.

पाण्यात पोहणे बंद करा. जर तुम्ही तलावात पोहत असाल किंवा समुद्रात बोटीवर असाल, तर ताबडतोब बाहेर या. वज्रघात बाधित व्यक्तीस त्वरित वैद्यकीय मदत मिळवून द्या.

जर व्यक्तीचा श्वासोच्छ्रास थांबला असेल, तर तोंडावर तोंड ठेवून कृत्रिम श्वासोच्छ्रुास द्या. संबंधित व्यक्तीला प्रथमोपचारानंतर तत्काळ रुग्णालयात दाखल करावे.



### हे करणे टाळावे

विजा कडकडत असल्यास घराबाहेर पडणे टाळावे, लोखंडी वस्तुजवळ राहू नये. विजा चमकत असल्यास झाडाखाली थांबू नये. झाडावरच सर्वाधिक विजा कोसळत असतात, हे विशेष.-

# ग्रामीण रूग्णालय रामभरोसे, प्रसूत महिला व रूग्णांचे हाल !

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९धामणगाव रेल्वे:**

येथील ग्रामीण रुग्णालयात रुग्णाची प्रचंड गैरसोय होत आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी रुग्णालय वाऱ्यावर सोडले असून रुग्णालय रामभरोसे असल्याचे दिसून येत आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रथमोपचारानंतर पुढील उपचारार्थ तालुक्यातील गोरगरीब शहरातील ग्रामीण रुग्णालयात धाव घेतात. रुग्णालयात रुग्ण येतातः मात्र त्यांना पुरेसा उपचार मिळत नाही. शुगरच्या रुग्णाच्या रक्त तपासण्या ग्लुकोमीटर स्ट्रिप नसल्याचे कारण देऊन थांबविल्या जातात. विविध लत्सीकरणासाठी औषधे उपलब्ध नसल्याने रुग्णाची टाळाटाळ केली जाते. जनरेटरची व्यवस्था असूनही भरती रुग्णांना अंधारात रात्र काढावी लागते. याशिवाय स्वच्छतेकडे दुर्लक्ष केले जात आहे. प्रसूत महिलांना पूर्णतः



मोफत उपचार मिळावा, हे शासनाकडून बांधनकारक असताना अनेकदा महिलांना संदर्भ सेवा देऊन जिल्हा रुग्णालयात उपचार घ्यावा लागत आहे. एका रुग्णालयातून जिल्हा रुग्णालयात जाण्यासाठी रुग्णवाहिका मोफत असतानाही प्रसूत महिलांना मोफत रुग्णवाहिका उपल्बध होत नाही, असेही निदर्शनास आले असून रुाणकल्याण समितीचेसुद्धा या विविध समस्यांकडे दुर्लक्ष होत आहे. याठिकाणी वैद्यकीय सेवा पूर्णतः कोलमडली आहे. तरीसुद्धा येथील वैद्यकीय अधीक्षक रुग्णालयात फिरकूनही पाहत नसल्याची वास्तविकता समोर आली आहे.

# शहरातील मुख्य रस्त्याने घेतला मोकळा श्वास: रस्त्यावरील खांबांवर असलेले बॅनर हटले, सौंदर्य वाढवण्यासाठी प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९मोर्शी–** शहराच्या मुख्य रस्त्यावरच विद्रूपीकरणात भर घालणारे राजकीय शुभेच्छा, कार्यक्रमांचे तसेच वाढदिवसाचे बॅनर दिव्य मराठीत वृत्त प्रसिद्ध होताच काढण्यात आले.

शहराच्या मुख्य रस्त्यावर त्याच बरोबर धार्मिक स्थळावर सुद्धा मोठ्या प्रमाणात बॅनर लावण्यात आले होते. त्यामुळे शहराचे विद्रूपीकरण होत होते. तसेच वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत होता. याबाबतचे वृत्त प्रकाशीत होताच शहरातील बॅनर काढण्याची मोहीम नगर परिषदेच्या वतीने काढण्यात आली आहे. २७ रोजी सकाळी स्वच्छता विभागाकडून ही मोहीम सुरू झाल्याने शहरातील मुख्य रस्त्याने मोकळा श्वास घेतल्याचे दिसून आले आहे.

स्थानिक नगर परिषद प्रशासनाकडून जाहिरात होर्डिंग लावल्यावर कोणतीही कारवाई केली जात नसल्याने शहराच्या विविध भागात वाढदिवसाचे व शिकवणी वर्गाचे बॅनर मोठ्या प्रमाणात झळकले होते. रस्त्यावरच हे होर्डिंग लावण्यात येत असल्याने शहराचे विद्रूपीकरण झाले होते.रस्ता दुभाजकावर अनेक बॅनर लावले जात असल्याने वाहन चालविताना त्याकडे लक्ष जात होते. पर्यायाने अपघात होण्याची शक्यता बळावली होती. अनेकदा मोठी पोस्टर लागल्यास व त्यावर अनेक फोटो असल्यास ते पाहण्यासाठी नागरीक रस्त्यावरच थांबत होते. पर्यायाने वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता.

अनेकदा वादळ तसेच वाऱ्यामुळे रस्त्यावर लावलेल्या फ्लेक्स उडत होत्या. त्यामुळे सुद्धा अपघात होण्याची शक्यता वाढली होती.

जयस्तंभ चौक तसेच तेथे असलेल्या मंदिरांवरही फ्लेक्स लावले जात असल्याने मोर्शी शहर हे या बॅनरबाजीमुळे गुदमरून गेले होते. मोर्शी नगरपालिकेच्या माध्यमातून देखील या अनधिकृत बॅनर पोस्टरवर कोणत्याही स्वरुपाची कारवाई केली जात नव्हती. मुख्य रस्त्यांवरील विद्युत खांबांवरही फलक लावले जातात. अशा प्रकारचे बॅनर लावण्यामध्ये राजकीय पक्षांचे कार्यकर्ते व स्वयं घोषित समाजसेवक आघाडीवर असल्याचे दिसून आले.

अशा प्रकारांना आळा बसावा यासाठी नगर पालिकेने शहरातील काही ठिकाणे निश्चित करून त्याठिकाणी बॅनर लावण्यासाठी परवानगी घेण्याची योजना सुरू करणे आवश्यक आहे.



शहराचे सौंदर्य खराब करणारे बॅनर

नकोच शहरात विविध सौंदर्य स्थळे असली तरी ती या जाहिरातीच्या होर्डिंग, बॅनरमुळे झाकली जात आहेत. त्यामुळे शहराचे सौंदर्यीकरण करण्याचा कितीही प्रयत्न केला तरी त्याचा कोणताच फायदा होत नसल्याचे नगर परिषदेच्या निदर्शनात आल्यानंतर त्यांनी अनधिकृत बॅनर, फ्लेक्स, होर्डिंग काढण्यास सुरुवात केली. त्यामुळे शहरातील रस्ते बॅनरमुक्त होत असून सर्वसामान्यांनी याचे स्वागत केले आहे.

# यवतमाळ जिल्ह्यातील २१ महसुली मंडळात पावसाचा कहर, मशागतीची कामे खोळंबल्याने चिंता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९यवतमाळ**

जिल्ह्यात अवकाळी पावसानंतर आता मान्सूनपूर्व पावसाचा कहर वाढू लागला आहे. मंगळवार, २७ मे रोजी रात्री संपूर्ण जिल्ह्यात अवकाळी पावसाने दमदार हजेरी लावली. या पावसामुळे २१ महसुली मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली. पावसाचा शेतीपिकांना फटका बसून २१५ हेक्टरचे नुकसान झाले आहे.

यंदा राज्यात मान्सून ठरावीक कालावधीच्या १३ दिवस आधीच धडकणार असल्याचे हवामान विभागाने सांगितले आहे. त्यामुळे सध्या राज्यासह जिल्ह्यात मान्सूनपूर्व पाऊस बरसण्यास सुरुवात झाली आहे. मंगळवारी रात्री जिल्ह्यात सर्वत्र बरसलेल्या या मान्सूनपूर्व पावसामुळे २१ महसुली मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली आहे. मोठ्या प्रमाणात झालेल्या पावसाचा फटका शेतकऱ्यांना बसून २१५ हेक्टरवरील शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. आर्णी आणि पांढरकवडा या दोन तालुक्यांना मोठा फटका बसून शेतकऱ्यांचे तीळ, मूग, ज्वारी या पिकांचे नुकसान झाले आहे. जोरात



बरसलेल्या या पावसामुळे जिल्ह्यातील यवतमाळ तालुक्यातील २ महसुली मंडळे, दारव्हा तालुक्यातील ७ महसुली मंडळे, आर्णी ३, पुसद २, उमरखेड २, मारेगाव १, झरी २, राळेगाव १ आणि पांढरकवडा १ अशा एकूण २१ महसुली मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली. या भागातील शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. तसेच, वीज पडून ४ जनावरांचा मृत्यू झाला आहे.

आर्थिक गणित बिघडणार
अनेक शेतकरी रब्बी हंगामात घेतलेल्या पिकांमधून येणाऱ्या उत्पन्नाच्या भरवशावर खरीप हंगामाच्या लागवडीचे गणित लावून बसलेले असतात. मात्र यंदा रब्बीचे पीक हाती येण्याच्या वेळेवर बरसलेल्या या पावसाने आतापर्यंत शेती पिकांचे मोठे नुकसान केले आहे. शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे खरिपाच्या लागवडीचे सर्व आर्थिक गणित कोलमडले आहे.

# बियाणे खरेदीपूर्वी 'साथी'वर नोंदणी आवश्यक

## बनावट , कालबाह्य अनधिकृत बियाणे विक्रीस बसणार चाप, गैरप्रकारास बसणार आता आळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती–**

शेतकऱ्यांची अनेकदा बियाणे खरेदीतून फसवणूक होते. बोगस बियाण्यांना घालण्यासाठी वर्षीपासून बियाण्यांसाठी आळा या सत्यप्रत केंद्र सरकारच्या साथी पोर्टलवर नोंदवावे लागणार आहे.




दरवर्षीच कपाशी, सोयाबीन व इतर बियाणे उगवत नसल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी असतात. यात फसवणूक होऊन लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान होते. ते टाळण्यासाठी बनावट कालबाह्य आणि अनधिकृत बियाण्यांच्या विक्रीस प्रतिबंध घालण्यात आला आहे.

बियाणे विक्रीतील गैरप्रकारांनाआळा घालण्यासाठी शेतकऱ्यांना विकण्यात येणारे सत्यप्रत बियाणे आता साथी पोर्टलवर नोंदणी करूनच दिले जाणार आहे. कृषी केंद्र संचालकांना या वर्षीपासून शेतकऱ्यांची फसवणूक करून बियाणे चढ्या दराने विकता येणार नाही. शासनाच्या या निर्णयामुळे गैरप्रकारांना चाप बसणार आहे. राज्यात या वर्षी आवश्यक तेवढे बियाणे आणि खते उपलब्ध आहेत. कोणताही तुटवडा पडणार नाही, असे शासनाकडून सांगण्यात येत आहे. मागील वर्षाचा कल पाहता कोणते पीक कमी-अधिक प्रमाणात घेता येईल याचा विचार करूनच बियाण्यांची उपलब्धता करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले आहे.

(कलर बॉक्स)सत्यप्रत बियाण्यांचीही होणार नोंदणी

दरवर्षीच शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करताना त्यांची फसवणूक झाल्याच्या अनेक तक्रारी केल्या आहेत. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कृषी विभागाकडून अनेक उपाययोजना राबविल्या जात आहेत. त्याद्वारे नियंत्रण आणण्यात यशही आले आहे. मात्र, तरीही शेतकरयांच्या माथी बोगस बियाणे मारल्याच्या तक्रारी आहेत. त्याच अनुषंगाने बोगस बियाणे रोखण्यासाठी केंद्राच्या साथी पोर्टलवर नोंदणी करावी लागणार आहे. यामुळे बियाण्यांचे नेमके उत्पादन कुठे झाले हे ट्रेस करता येते. या सत्यप्रत बियाण्यांनाही आता केंद्राच्या साथी पोर्टलवर नोंदवावे लागणार आहे. केवळ शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठीच शासनाने ही स्वतंत्र प्रणाली कार्यान्वित केली आहे.

# महाकाय पार्टचा ट्रक काढण्याच्या प्रयत्नात दिशादर्शक फलक कोसळले!

## अर्धा तास वाहतूक विस्कळीत गुरुकुंज मोझरी बायपास वळणावर घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९तिवसा :** अमरावती-नागपूर महामार्गाने एका महाकाय ट्रकने मशिन्सचा पार्ट दिशादर्शक फलकाच्या खालून काढण्याच्या प्रयत्नात फलक कोसळल्याने महामार्गावरील वाहतूक मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाली होती. गुरुकुंज मोझरी बायपास वळणाजवळ हा प्रकार समोर आला.अमरावती ते नागपूर राष्ट्रीय महामार्गाने समोर मोठमोठ्या शहराच्या दिशेने महाकाय ट्रकमध्ये कंपनीतील मशिन्सचे पार्ट लोड करून नेल्या जातात. महामार्गावर लावलेले दिशादर्शक फलक व लांबच लांब ट्रक व त्यामधील मशिन्सच्या पार्टची उंची ही तंतोतंत किंवा त्यापेक्षा अधिक असल्याने हे ट्रक पास होण्यास अडथळे येत असूनपरिणामी अशा ट्रकला महामार्गावर मुक्काम ठोकावे लागते. गेल्या दोन ते तीन दिवसांपासून असाच एक मशीन पार्ट नेणारा महाकाय ट्रक नागपूरकडे जाताना गुरुकुंज मोझरीजवळील बायपास वळणावर मुक्कामी होता. दिशादर्शक फलकाखालून सदर ट्रक काढणे अवघड असल्याने संबंधित कंपनी व कंत्राटदारांच्यापरवानगीशिवाय ट्रक काढणे शक्य नव्हते. बुधवारी अखेर हा ट्रक सकाळी ११ वाजता काढण्याचा प्रयत्न करण्यात आला व यातच ट्रकमधील मशीनच्या पार्टचा वरील भाग फलकाला भिडला व अमरावतीच्या दिशेने लागलेले



एवढे मोठे दिशादर्शक फलक थेट खाली येऊन कोसळले.सुदैवाने तेव्हा वाहतूक थांबविण्यात आल्याने कोणतीही हानी होऊ शकली नसली तरी मात्र सदर फलक दोन क्रेनच्या माध्यमातून हायवेवरून बाजूला करण्यात संबंधित विभागाच्या टीमला वाहतूक थांबवून तारेवरची कसरत करावी लागली. जवळपास अर्धा तास हे काम सुरू होते. हायवेवरील अमरावतीच्या दिशेने जाणारी एकतर्फी वाहतूक चांगलीच खोळंबली होती. प्रवाशी जनतेला सदर फलक हटविण्याच्या कामातून दुखापत होऊ नये, कुण्या वाहनाचे नुकसान होऊ नये, म्हणून ही खबरदारी संबंधित कंपनीच्या कंत्राटदारांनी यावेळी घेतली होती, हे विशेष.

# २ लाख ११ हजारांचा गुटखा जप्त, आरोपीस अटक

## अन्न व औषध प्रशासन विभाग व गुन्हेशाखा युनिट क्र १ ची कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती:**

शासनाने प्रतिबंधित केलेला २,११,६८० रुपयांचा गुटखा पो. स्टे नागपुरी गेट हद्दीत धाड टाकून मुद्देमाल आरोपीसह ताब्यात घेतला आहे. गुन्हेशाखा युनिट क्रमांक १ ने ही केली. गुन्हेशाखा युनिट क्र. १ चे अधिकारी व अंमलदार पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, डायमंड स्टार ट्रांसपोर्ट कंपनी नावाचे दुकानाच्या आत महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटख्याची साठवणूक केलेली आहे. अन्न सुरक्षा अधिकारी गजानन गोरे याना फोनद्वारे ही माहितीमिळताच त्यानुसार पंचासह डायमंड स्टार ट्रान्सपोर्ट कंपनी येथे रेड केली असता सदरठिकाणी १४ मोठ्या प्लॅस्टीकचे पोते आढळून आले. ज्याची एकूण किंमत २.११,६८० रुपये आहे. शासनाने प्रतिबंधित केलेला मुद्देमाल डायमंड स्टार ट्रान्सपोर्ट कंपनीचे संचालक आरोपी अब्दुल सलीम अब्दुल कादर (३५) रा. छायानगर याने सदरचा माल हा आरोपी प्रवीण ठक्कर रा. नागपूर याचा असल्याचे सांगीतल्याने फिर्यादी अन्न सुरक्षा अधिकारी गजानन गोरे यांच्या फिर्यादीवरून दोन्ही आरोपीवर पोलिसस्टेशन नागपुरी गेट येथेगुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिसस्टेशन नागपुरी गेट करत आहे.ही कारवाई पोलिस आयुक्त, अरविंद चावरिया, पोलिस उपआयुक्त कल्पना बारवकर, पोलिस उपआयुक्त सागर पाटील, सहायक पोलिस आयुक्त अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पो. नि. वरिष्ठ पोलिस निरिक्षक गोरखनाथ जाधव, सपोनि मनीष वाकोडे, पो. उपनि. प्रकाश झोपाटे, पोहवा सतीश देशमुख, पोहता फिरोज खान, पो. हे. कॉ. सचिन बहाळे, पो. हे. कॉ. प्रशांत मोहोड, पो.हे. कॉ. अलीमउद्दीन खतीब, नाईक पोलिस अंमलदार नाझीमउद्दीन सैयद, विकास गुढघे, सचिन भोयर, पोलिस अंमलदार सूरज चव्हाण, निखील गेडाम, रंजित गावंडे, चालकअशोक खंगार, किशोर खेंगरे, गुन्हेशाखा युनिट क्र. १ तसेच गजानन गोरे व घनशाम दंदे अन्न सुरक्षा अधिकारी, मुकेश मोहोड व अन्न व औषधी प्रशासन यांनी केलेली आहे.

# जूनमध्ये मान्सून खोळंबणार, शेतकऱ्यांनो पेरणीची घाई नको!

## मान्सूनची दुसरी शाखा बंगालच्या उपसागरावरून ६ जून रोजी विदर्भात प्रवेश करण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती –**

नैऋत्य मान्सून सध्या मध्य अरबी समुद्राच्या आणखी काही भागात पुढे सरकला आहे. तो मुंबई, कर्नाटकसह महाराष्ट्राच्या काही भागात, बंगळुरूसह तामिळनाडूचा उर्वरित भाग, तेलंगणाचा काही भाग आणि आंध्र प्रदेशचा आणखी काही भाग इथपर्यंत पोहोचला आहे. परिसरावरील कमी दाबाचे क्षेत्र चक्रीवादळ परिवलन मध्य ट्रोपोस्फेरिक पातळीपर्यंत विस्तारित आहे. २७ मे रोजी पश्चिम मध्य आणि लगतच्या उत्तर बंगालच्या उपसागरातर कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे.



कोरडी हवा मान्सूनसाठी घातक ठरते. कारण ती मान्सूनच्या प्रक्रियेत आवश्यक असलेल्या आर्द्रतेच्या प्रमाणास बाधा पोहोचवते. मान्सून म्हणजे ऊबदार, आर्द्र हवासमूहांमुळे होणारा पाऊस. जर हवा कोरडी असेल, तर ती बाष्पीभवन कमी करते, ज्यामुळे ढग तयार होण्यास मदत होत नाही. कोरड्या हवेचे मान्सूनवर परिणाम होतात.

कोरड्या हवेमुळे वातावरणातील आर्द्रता कमी होते. ही आर्द्रता ढगांच्या निर्मितीसाठी आवश्यक असते. आर्द्रता कमी झाल्यास ढग तयार होत नाहीत आणि पाऊस पडत नाही.मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात मान्सूनपूर्व पाऊस

साधारण पेरणीलायक पाऊस हा विदर्भात १३ जून, मराठवाडा २१ जून आणि उत्तर महाराष्ट्रात १७जूनपासून अपेक्षित आहे. ज्यांच्याकडे मुबलक पाणी आहे, त्यांनी आताच्या मान्सूनपूर्व ओलीवर पेरणी केली तरी चालेल.– **अभिषेक खेरडे, अभ्यासक**

विश्रांती घेणार, शेतीची कामे उरकवा : २७ मे ते १ जूनदरम्यान संपूर्ण राज्यात चारही विभागात पावसाची शक्यता ही विखुरलेल्या आणि गडगडाटी स्वरूपात राहील. पावसाचे प्रमाण हे मुंबई, कोकण, नगर, पुणे आणि नाशिक या भागात जास्त राहील. कमी वेळेतच जास्त पाऊस अनुभवायला येईल. बाकी विभागात १ ते ६ जूनपर्यंत सूर्यदर्शन राहील. यावेळी शेतकर्यांनी नांगरणी, वखरणीची कामे उरकून घ्यावीत आणि पुढे जमिनीत पुरेसा ओलावा आल्यानंतरच पेरणीचा निर्णय घ्यावा, असे हवामान अभ्यासकांकडून सांगण्यात येत आहे.

# नाफेडच्या तूर खरेदीची मुदत वाढवा !

## युवा स्वाभिमान पार्टीची मागणीजिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती:**

केंद्र सरकारची नाफेड तूर खरेदीची अंतिम तारीख २८ मे आहे. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचा शेतमाल घरात पडून असल्यामुळे नाफेड तूर खरेदीची मुदतवाढ १५ दिवसांकरिता वाढविण्याची मागणी युवा स्वाभिमान पार्टीने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचा शेतातील पिकांचे, फळांचे, भाजीपाल्यांचे व उन्हाळी पिकांचे नुकसान झाले आहे, तसेच काही घरांची पडझड झालेली असून गुरे वाहून गेलेली आहे. तसेच अनेक ठिकाणी विजेचे खांब व वीजवाहिनी तुटलेली असल्याने वीजपुरवठा खंडीत झालेला आहे.

तरी जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विभागाला निर्देश देऊन पंचनामे करून झालेली नुकसान भरपाई देण्याकरिता व विस्कळीत झालेली कामे पूर्ववत आणण्याकरिता निर्देश द्यावे.तसेच केंद्र सरकारची नाफेड तूर खरेदीची अंतिम तारीख २८ मे आहे. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचा शेतमाल घरात पडून असल्यामुळे नाफेड तूर खरेदीची



मुदतवाढ १५ दिवसांकरिता वाढविण्याची मागणी युवा स्वाभिमान पार्टी ने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

निवेदन देतेवेळी श्रीकृष्ण बैलमारे, अर्जुन दाते, सुमेध खांडेकर, भूषण वाणे, ओंकार मोहोड, गुणवंत मेश्राम, देवानंद राठोड, जगदीश अंबडकर, धर्मेंद्र मेहरे, मंगेश घाटे, उद्धव कराळे, बंडूडकरे, गौतम खंडारे, अक्षय देशमुख, ज्ञानेश्वर कळसकर, आशिष कावरे, राजू हरणे, राजू रोडगे, जयंत देशमुख, सुनील निचत, मिलिंद मोडक, जीवन सरदार, प्रवीण चोखट आदी उपस्थित होते.

शेतकऱ्यांचे शेतातील शेतमालाचे, फळपिकाचे व भाजीपाल्याचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले असल्याने शेतकरी हवालदिल झालेला आहे व उन्हाळी पिकांचे नुकसान होऊन शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला आह, तसेच अनेक ठिकाणी ग्रामीण भागातील गोरगरीब नागरिकांच्या घरांची पडझड झालेली आहे, तसेच गुरे वाहून गेलेली असल्याने त्यांचेसुध्दा पंचनामे त्वरित करण्यात यावे.

# १२ टन आंब्याची विक्री; २००० शेतकरी सहभागी

## कृषी विज्ञान केंद्रातील विक्री व प्रदर्शनात ५८ जातीचे आंबे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९बुलढाणा –**

बुलडाणा भारतीय आंबा फळाला आंतरराष्ट्रीय तसेच देशांतर्गत बाजारपेठेत प्रचंड मागणी असल्याने त्याच्या लागवडीखालील क्षेत्राचा विस्तार व्हावा, अशी अपेक्षा कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. पं.दे.कृ.वि.,कुलगुरू अकोला डॉ. शरद गडाख शेतकऱ्यांपुढे व्यक्त केली. उदघाटक जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पारंपारिक पिकाची लागवड न करता फळ पिकांच्या लागवडीकडे वळण्याचे आवाहन आपल्या भाषणात उपस्थित शेतकऱ्यांना केले. जिल्ह्यातील २००० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी दिवसभरात भेट दिली, या दरम्यान एकूण १२ टन आंब्याची विक्री झाल्याची नोंद करण्यात आली. जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना आंबा उत्पादनासाठी वाव मिळावा व आंबा प्रेमींना विविध जातींच्या आंब्याची चव चाखता यावी यासाठी कृषि विज्ञान केंद्र, अजिंठा रोड, बुलडाणा येथे कृषि विज्ञान केंद्र, कृषि विभाग, आत्मा, व महिला आर्थिक विकास महामंडळ, बुलडाणा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २८ मे रोजी आंबा महोत्सव २०२५ :आंबा प्रदर्शन व विक्री तसेच कार्यशाळा चे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाच्या निमित्ताने जिल्ह्यातील बऱ्याच आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी त्यांच्याकडील एकूण ५८ जातींचे आंबे प्रदर्शनामध्ये विक्रीकरिता दालनात ठेवण्यात

### खाद्य पदार्थांचेही चार दालन

आले होते. तसेच आंब्यावर प्रक्रिया व मूल्यवर्धन केलेल्या विविध खाद्य पदार्थांचे महिला बचत गटांचे जिल्ह्यातील २००० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी दिवसभरात भेट दिली, या



दरम्यान एकूण १२ टन आंब्याची विक्री झाल्याची नोंद करण्यात आली. जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना आंबा उत्पादनासाठी वाव मिळावा व आंबा प्रेमींना विविध जातींच्या आंब्याची चव चाखता यावी४ दालन लावण्यात आले होते. यावेळी प्रमुख उपस्थिती भा.फु.शा.कृ.मचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद वाकळे, फळशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शशांक भराड, माजी वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. बी. आर. पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे, सहयोगी प्राध्यापक डॉ. उज्वल राऊत, प्रमुख-कृषी संशोधन केंद्र डॉ. दिनेश कानवडे, प्राचार्य कृषी तंत्र विद्यालय डॉ. सतीशचंद्र जाधव, सहजिल्हा समन्वय अधिकारी समीर देशमुख यांची उपस्थिती होती. या आंबा महोत्सवाचे प्रास्ताविक कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अमोल झापे यांनी केले. सूत्रसंचालन व आभार डॉ. अनिल तारू यांनी केले.

# अमरावती शहर व जिल्ह्यासाठी नवीन ५० ई-बसेस मंजुर

## कोंडेश्वर रोडवर २.३८ हे.आर क्षेत्रात ई-बस डेपो व होणार चार्जिंग स्टेशनची उभारणी - आ.रवि राणा यांनी दिली अमरावतीकरांना ई-बसची विशेष भेट!



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

अमरावती शहराचा दिवसेंदिवस व्याप वाढत असुन अनेक क्षेत्रामध्ये अमरावती शहरे प्रगतीच्या मार्गावर असल्याचे दिसुन येत आहे. त्याअनुषंगाने मेट्रो पॉलिटीन शहराकरिता ई-बस सेवा अनिवार्य असल्याचे केंद्र शासन पुरस्कृत पी.एम ई-बस योजनेअंतर्गत आ.रवि राणा यांनी शासनाकडे विशेष पाठपुरावा केला तसेच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी केलेल्या विशेष सहकार्याने अमरावती शहराकरिता ५० पी.एम ई-बसेस मंजुर झाल्या असुन बस डेपो करिता तसेच चार्जिंग स्टेशनसाठी कोंडेश्वर मार्गालगत २.३८ हे.आर एवढी जागा मंजुर करण्यात आली आहे.


ई-बस साठी जागा मंजुर झाल्याचे पत्र जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन सुद्धा प्राप्त झाले आहे. लवकरच वर्षाच्या अखेरीस ई-बसेसची सेवा अमरावती शहरातील नागरिकांना उपलब्ध होणार असल्याचे आ.रवि राणा यांनी सांगितले. तसेच पी.एम ई-बस सेवेसाठी लागणाऱ्या पायाभुत सुविधांकरिता केंद्रशासनाकडुन ५ कोटी रुपयांचा निधी सुद्धा मंजुर झाल्याचे यावेळी आ.रवि राणा यांनी सांगितले. आ.रवि राणा यांनी केलेल्या अथक प्रयत्नाने अमरावतीकरांना ई-बस सेवेचा लाभ मिळणार असुन याबद्दल अमरावती शहर वासियांनी आ.रवि राणा यांचे आभार व्यक्त केले.

# पोर्टलवर नोंदणी नाही केली तर अकरावीचे ॲडमिशन अडणार

## नोंदणीला सुरुवात : ३ जूनपर्यंत करता येणार आहे विद्यार्थ्यांची नोंदणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

राज्यात पहिल्यांदाच अकरावीची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार आहे. अमरावती जिल्ह्यातील शेकडोच्या वर महाविद्यालयांनी यासाठी नोंदणी केली आहे. बुधवार, २१ मे पासून प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. परंतु, ज्या विद्यार्थ्यांनी पोर्टलवर प्रवेशाच्या अनुषंगाने नोंदणी केली नाही त्यांना अडचणींचा



सामना करावा लागणार आहे.अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेसाठी स्वतंत्र संकेतस्थळ तयार केले आहे. २१ मेपासून ३ जूनपर्यंत प्रवेश प्रक्रिया चालणार आहे. या दरम्यान प्रत्यक्ष नोंदणी आणि पसंती नोंदविणे गरजेचे आहे. त्यात व्यवस्थापन कोटा, इन हाऊस आणि अल्पसंख्याक अर्ज करून घेणे आवश्यक आहे. त्यानंतर नोंदणी होणार नाही. तसेच तात्पुरती गुणवत्ता यादी प्रकाशित होणार असून त्यानंतर हरकती आणि दुरुस्ती प्रक्रिया चालणार आहे. राज्यात प्रथमच इयत्ता अकरावीसाठी ऑनलाइन पद्धतचा अवलंब होत आहे. पहिल्याच दिवशी रेकॉर्डतोड नोंदणी झाल्याने नोंदणीचा अवधी ३ जूनपर्यंत वाढविण्यात आल्याची घोषणा काल करण्यात आली.

**पसंतीक्रमानुसार प्रवेश**

प्रवेशासाठी नोंदणीनंतर विद्यार्थ्यांना पसंतीक्रम द्यायचे आहेत. विद्यार्थ्यांच्या पसंतीनुसार त्यांच्या आवडीच्या महाविद्यालयात प्रवेश घेता येणार आहे.

'कॉलेज-ट्यूशनअनेकांनी मोठ-मोठ्या इन्स्टिट्यूट सुरू केल्या असून एखाद्या कॉलेजशी टायअप करत असतात. मात्र आता प्रवेशाला ब्रेक लागणार आहे. यापूर्वी थेट अकरावीत कोणत्याही कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थी प्रवेश घेत होते. परंतु, यावर्षीपासून ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येत असल्याने शाळा तसेच विद्यार्थी व पालकांची डोकेदुखी वाढली आहे, हेही तितकीच बाब सध्यातरी दिसून येत आहे.

# महाराष्ट्र एक्स्प्रेसला १ जूनपासून नवीन १८ एलएचबी कोच वजनाला हलकी असलेली गाडी धावणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९बडनेरा**

राज्यातील सर्वाधिक लांब अंतरधावणारी ही गाडी रोज कोल्हापूर ते गोंदिया गाडी क्रमांक ११०३९. ३ जूनपासून गोंदिया रेल्वेस्थानकावर एलएचबी कोच आणि नवीन संरचनेनुसार धावणार आहे. तब्बल ५४ वर्षानंतर हा बदल होत आहे. पहिला प्रवास १ नोव्हेंबर १९७१ कोल्हापूर-गोंदिया मार्गावर सुरू झाला होता. त्यानंतर गाडीमध्ये बदल केला जात आहे. ही गाडी बारा जिल्ह्यातून प्रवास करते. यामध्ये कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, अहिल्यानगर, जळगाव, अकोला, बुलढाणा, अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा १२४१ किलोमीटरचा मार्ग आहे. २७ तास ४५ मिनिटे ११० किलोमीटर ताशी वेग २.४५ वाजता कोल्हापुरातील छत्रपती शाहू महाराज टर्मिनलवरून नार्गस्थ ६ वाजता दुसऱ्या दिवशी गोंदिया स्थानळावर पोहोचते. ६२ स्थानकावर थाबा यामध्ये गाडीची संरचना एक द्वितीय वातानुकुलित, चार तृतीय वातानुकुलित कोच, सात शयनायनकोच, चार सामान्य जनरल, एक जनरेटर कोच तसेच एक द्वितीय सामान्य कोच अशी गाडीची संरचना राहील.वजनाला हलकी आणि जास्त आसन क्षमता स्वच्छता गृहे असलेली हे नवीन एल. एस. बी. कोच लावल्याने रेल्वेला आणखी गती मिळणार आहे. त्यामुळे या बदलामुळे पूर्वीपेक्षा अधिक आरामदायी सुरक्षित सुखकर आणि सोयीस्कर प्रवाशांना प्रवासाचा आनंद घेता येईल.

# रासायनिक खतांच्या किमतीत भरघोस वाढ, शेतकरी देताहेत शेणखताला पहिली पसंती

## शेजमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी होते मदत : १२००रु.पारंपारिक शेणखताला मिळतोय भाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९चांदुर बाजार**

शेतात सातत्याने रासायनिक खतांचा वापर वाढल्याने शेतजमिनीचे नुकसान झाले आहे. दरवर्षी उत्पादनात घट होत आहे. रासायनिक खतांच्या वापरामुळे शेतजमिनीची सुपीकता टिकाव धरत नाही. परिणामी, ग्रामीण भागातील शेतकरी शेणखताकडे वळलेला दिसत आहे. दिवसेंदिवस रासायनिक खतांचे वाढीव दर लक्षात घेता शेतकरी घरच्याच शेणखताला अधिक



महत्त्व देत आहेत. शेणखत शेतीसाठी अत्यंत फायदेशीर असून, या खताचा वापर केल्यास जमिनीचा पोत सुधारतो. मानवी आरोग्यासाठी शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळण्याची गरज आहे.

चांदुर बाजार तालुक्यातील माधान शेत शिवारात खरीप हंगामाच्या तयारीसाठी शेतकरी शेतात शेणखत पसरविण्याच्या कामात व्यस्त आहे. रासायनिक खताच्या वापरामुळे शेतजमिनीची सुपीक्ता नष्ट होत असते. परिणामी, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची अधिक पसंती असल्याचे दिसते. शेतजमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी सेंद्रिय, गांडूळ, शेणखत व जैविक खताचा वापर केला जातो. पाळीव जनावरांच्या शेणापासून तयार झालेले खत जमिनीच्या सुपीकतेसाठी बरेच फायदेशीर असते. सध्या शेतशिवारात बैलबंडी व ट्रॅक्टरच्या माध्यमातून शेतात शेणखत टाकणे सुरू असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.


**शेणखताला सोन्याचा भाव**

शेतकऱ्यांकडील पशुधन पूर्वीच्या तुलनेत कमी झाल्याने शेतात शेणखताचा वापर कमी झाला आहे. परिणामी, रासायनिक खतामुळे जमिनीचा पोत खालावत चालला आहे. जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी शेणखताची गरज आहे. जनावरांची संख्याही कमी झाली आहे.

# फिनले मिल कामगारांचे चिमणी आंदोलन तिसऱ्या दिवशीही उपोषण सुरूच : राजकीय पुढाऱ्यांचेही दुर्लक्ष; दुर्दैवाची बाब

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अचलपूर**

फिनले मिल सुरू करण्यासाठी कामगारांनी चिमणीवर चढून आपल्या जिवाची बाजी लावत आंदोलन सुरू केले आहे. मंगळवारी सकाळपासून सुरू झालेले आंदोलन तिसऱ्या दिवशीही सुरूच आहे. सदर आंदोलक २०० फूट उंच अंतर असलेल्या चिमणीवर अवघ्या दीड फूट जागेत ते कसेबसे तग धरून थांबले आहेत. उल्लेखनीय म्हणजे याही अवस्थेत त्यांनी अन्न त्याग पुकारला आहे. चिमणीवर तीन दिवसांपासून उपाशी असलेल्या आंदोलनकर्त्यांबद्दल जुळ्या शहरासह पंचक्रोशीतील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.विशेष म्हणजे नेहमी उदो उदो करणारे राजकीय पुढारी ही सध्या या प्रकरणाकडे लक्ष देत नसल्याचे पाहावयास मिळत आहे.



मंगळवारी सकाळपासून मिल कामगारांनी मिलमध्ये जाऊन मागील काही वर्षांपासून अकारण बंद ठेवण्यात आलेल्या मिलमध्ये तीव्र आंदोलन सुरू केले. आंदोलनकर्त्यापैकी विक्की उघडे, मनोज सूर्यवंशी हे दोघे कामगार २०० फूट उंच असलेल्या चिमणीवर चढले आणि त्यांनी अन्नत्याग करणार असल्याची घोषणा केली, तर उर्वरित आंदोलक चिमणीच्या बाजूला असलेल्या परिसरात आंदोलन करीत आहे. तोडगा निघाल्याशिवाय चिमणीखाली उतरणार नाही, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली आहे. प्रशासनाने त्यांना खाली उतरवण्याचा प्रयत्न केला: मात्र आंदोलक आपल्या भूमिकेवर ठाम आहेत.मिलच्या दोन्ही गेटपुढे पोलिस कर्मचारी तैनात आहे, तर मिलच्या आतील परिसरात मिलने नेमणूक केलेले गार्ड आणि पोलिस आहेत. उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांनी घटनास्थळी भेट देऊन आंदोलनकर्त्यांशी चर्चा करून तोडगा काढण्याचा प्रयत्न केला होता. मिलच्या दोन्ही गेटवर तैनात गार्डने प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या प्रतिनिधींना आत जाऊ देण्यास आणि वार्तांकन करण्यास मज्जाव केला. एनटीसीने याबाबत आदेश दिल्यामुळे आम्ही आदेशाचे पालन करीत असल्याचे गार्ड यांच्याकडून सांगण्यात आले.पालक मंत्री बावनकुळे दौऱ्यावर असताना मिल कामगारांनी त्यांच्यापुढे आपल्या व्यथा मांडल्या होत्या. त्याबाबत १५ दिवसांत मीटिंग लावून यावर सविस्तर चर्चा करून तोडगा निघेल, याबाबत प्रयत्न करण्याचे पालकमंत्र्यांनी आश्वासन दिले होते; मात्र सदर आश्वासनाची पूर्तता होत नसल्याचे लक्षात येतात कामगारांनी तीव्र आंदोलन करण्याचा पवित्रा घेतला आहे. जर शासनाने तत्काळ यावर तोडगा काढला नाही तर त्यापेक्षाही उग्र आंदोलन करू, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.

# नव्या पाठ्यपुस्तकांमध्ये कोऱ्या पानांना पूर्णविराम

**सुधीर केने**

## शिक्षक मुख्याध्यापक व विद्यार्थ्यांनी सोडला सुटकेचा श्वास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

अमरावती- नव्या शैक्षणिक धोरणानुसार पहिली पासून बारावी पर्यंतचा अभ्यासक्रम बदलणार आहे.दरम्यान पहिली ते आठवी या इयत्तेपर्यंत प्रत्येक पाठाला जोडून एक कोरे पान देण्यात येत होते ते आता रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे नव्या पाठ्यपुस्तकांमध्ये पाठांनंतरच्या कोऱ्या पानाला पूर्णविराम देण्यात आला आहे.त्यामुळे शिक्षक मुख्याध्यापक व विद्यार्थ्यांनीही सुटकेचा श्वास सोडला आहे.शिक्षण क्षेत्रात नेहमीच अनेक बदल केले जातात.एक नवा उपक्रम म्हणून दोन वर्षांपूर्वी पहिली ते आठवीपर्यंत प्रत्येक पाठांनंतर कोरे पान देण्यात येत



होते.या पानावर विद्यार्थ्यांनी पाठ शिकवल्यानंतर काही नोट्स काढाव्यात यासाठी ही पाने देण्यात आली होती. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव मिळावा व पाठ शिकल्यानंतर आवश्यक ते मुद्दे त्या पानावर लिहून ठेवावे हा त्यामागचा शुद्ध हेतू होता. परंतु, ही योजना यशस्वी ठरली नाही.गतवर्षी शासनाकडून शाळांची तपासणी करण्याचे आदेश प्राप्त झाले होते. त्यामध्ये

### शिक्षण विभागाचा योग्य निर्णय

नव्या पाठ्यपुस्तकांमध्ये प्रत्येक पाठांनंतर एक कोरेपान नसणार



आहे.शिक्षण विभागाने हा अत्यंत योग्य निर्णय घेतला आहे. यापूर्वी पुस्तकांमध्ये प्रत्येक पाठानंतर त्या पाठातील मुद्दे लिहिण्यासाठी कोरेपान दिले होते पण पहिलीपासून विद्यार्थ्यांसाठी ते फारसे शक्य नव्हते ही बाब शासनाच्या लक्षात आल्यानेच हा निर्णय घेतला असावा असे वाटते.

**राजेश सावरकर**
**राज्य प्रतिनिधीम. रा. प्राथमिक शिक्षक समिती**

विद्यार्थ्यांना जी पाठ्यपुस्तके दिलेली आहेत त्यामध्ये कोऱ्या पानांवर विद्यार्थ्यांनी मुद्दे लिहिले की नाही किंवा शिक्षकांनी त्यांना मुद्दे लिहायला लावले की नाही याची तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले होते. एकंदर त्या कोऱ्या पानामुळे फारसा बदल झाला नसल्याचे लक्षात आले त्याची फारशी अंमलबजावणी कुठल्याही शाळेमध्ये होताना दिसली नाही.म्हणून ते कोरे पानच काढून घेण्याचा निर्णय आता नव्या पाठ्यपुस्तकांमध्ये घेण्यात आला आहे.यावर्षी इयत्ता पहिलीचा अभ्यासक्रम बदलत आहे सुमारे ११ लाखापेक्षा अधिक विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके कोऱ्या पानाशिवाय देण्यात येणार आहे.याबाबत पाठ्यपुस्तक मंडळाचे संचालक कृष्णकुमार पाटील यांनी निर्देश जारी केले आहेत. राज्यात पहिली ते बारावीचा अभ्यासक्रम बदलणार आहे राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद अर्थात एन सी ई आर टी चा अभ्यासक्रम यंदापासून लागू होत आहे.याचा श्री गणेशा पहिलीपासून करण्यात आला आहे. नव्या शैक्षणिक धोरणाचा उद्देश साध्य करण्यासाठी सीबीएसई पॅटर्न नुसार अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे या नवीन अभ्यासक्रमाच्या पाठ्यपुस्तकाची छपाई सुरू आहे नवीन पुस्तकात मात्र कोरेपान नसणार आहे.

# शेतकऱ्यांचे सोयाबीन मातीमोल आणि सोयाबीन बियाण्यांना मात्र १०० रु. किलो भाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

वर्षभर सोयाबीनला हमीभाव मिळालेला नाही, पेरणीसाठी बहुतेक शेतकरी घरगुती सोयाबीन वापरतात, ते ४० रुपये किलोने पडते. तेच सोयाबीन बियाणे कंपनीचे विकत घेतल्यास १०० रुपये किलो दर द्यावा लागतो. यामध्ये शेतकऱ्यांनी लूट होत असल्याने बीजप्रक्रिया व उगवणशक्ती तपासून घरगुती बियाणे उत्तम



पर्याय ठरला आहे व बाहेरचे महागडे बियाणे विकत घेण्याची आवश्यकता नाही.

**पेरणीसाठी आवश्यक सोयाबीन बियाणे**

सोयाबीनसाठी प्रतिहेक्टर १०० किलो बियाणे आवश्यक आहे. त्यानुसार अमरावती जिल्ह्यात अमरावती तालुक्यात २९,९०० क्विंटल, भातकुली

सोयाबीनचे घरगुती बियाणे हा खात्रीचा पर्याय आहे. यामुळे उत्पादन खर्चात बचत होते. मात्र, बियाण्यांवर बीजप्रक्रिया करणे तसेच उगवण तपासणे आवश्यक आहे.

**- राहुल सातपुते, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी.**

३०,१००, नांदगाव खंडेश्वर ४७,०००, चांदूर रेल्वे २४,५३५, धामणगाव रेल्वे २१,८६०, तिवसा १९,०००, मोर्शी १६,५५०, वरूड २,७४१, चांदूर बाजार १५,५००, अचलपूर ११,०००, अंजनगाव सुर्जी १५,३००, दर्यापूर १३,१००, धारणी ४,५०० व चिखलदरा तालुक्यात ७,९५६ क्विंटल बियाणे आवश्यक आहे.

**सोयाबीन बियाण्यांची जिल्हा स्थिती**

प्रस्तावित क्षेत्र :
२,५९,०४२
हेक्टर लागणारे बियाणे :
२,५९,४४२ क्विंटल
उपलब्ध बियाणे :
२,४१,९६० क्विंटल

